क्र.२/नसवि/महासभा/ ०५ /२०२०-२०२१
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ०२ फेब्रुवारी २०२१

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## महानगरपालिका सभा क्रमांक - ०५ /२०२०-२०२१

### महानगरपालिका सभेची नोटीस (ऑनलाईन ॲपद्वारे)

प्रति,
मा. ------------------------------
सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मधील तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **बुधवार दि.१०/०२/२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय, सांगली येथे मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दि.०३ जुलै २०२० रोजीचे पत्रान्वये ऑनलाईन ॲपद्वारे आयोजित केली आहे.** या सभेमध्ये खालील परिशिष्टातील विषय विचाराधीन आहेत. तरी आपण सदर सभेस ऑनलाईन सहभागी व्हावे हि विनंती.

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण सभा दि.२०/०१/२०२१ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
अ) दु:खवठ्याचे ठराव. ब) अभिनंदनाचे ठराव.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका व जिवनज्योत कॅन्सर रिलीफ ॲण्ड केअर ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने कॅन्सर रुग्णांवर उपचार करण्याकामी जिवनआधार सांगली, प्रोजेक्ट सुरु करण्यासाठी वॉर्ड क्रमांक ९ मधील सर्व्हे क्रमांक ३०२ पैकी सि.स.नं.७८१०, ७८११ ही जागा २९ वर्षे कालावधीसाठी देणेकामी धोरणात्मक निर्णयासाठी आलेले उपायुक्त,मिरज (आरोग्य विभाग,मिरज) यांचे दि.०२/०२/२०२१ चे विषयपत्र.

५. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

६. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

मा.महापौरसो यांचे मान्यतेने वितरीत

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**(टिप - मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दि.०३ जुलै २०२० रोजीचे पत्रान्वये कळविलेनुसार सदरची सभा ऑनलाईन ॲपद्वारे आयोजित केली असून, सदर ऑनलाईन सभेच्या प्रक्रियेसंदर्भात अधिक माहितीसाठी सन्मा.सदस्यांनी महापालिका सिस्टीम मॅनेंजर यांचेशी संपर्क साधावा ही विनंती.)**

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## सूचना (पुरवणी) कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०५/२०२०-२०२१

## महापालिका सभा दिनांक १०/०२/२०२१ करीता.(ऑनलाईन ॲपद्वारे)

बुधवार दि.१०/०२/२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह, मुख्यालय, सांगली येथे ऑनलाईन ॲपद्वारे होणाऱ्या महापालिका सभेपुढे ठेवण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन "महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये खाली नमूद केलेल्या प्रस्तावाच्या सूचना मा.सदस्य यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत.

१. **श्री.पांडूरंग मार्तंड कोरे यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महानगरपालिका क्षेत्रातील मिरज वॉर्ड क्र.४ मधील ब्राम्हणपूरी येथील काशिविश्वेश्वर मंदिर ते सव्वाशे घर या रस्त्यास कै.सुभाष हरीभाऊ सव्वाशे तथा तात्या सव्वाशे मार्ग असे कायमस्वरुपी नामकरण करणेबाबत परिसरातील नागरिकांची मागणी होत आहे. कै.लक्ष्मण सव्वाशे हे मिरज शहरातील नामवंत मंडप व्यावसायीक होते. आपल्या व्यवसायाच्या माध्यमातून गोर गरीबांना मदतीचा हात दिला असून, सामाजिक कार्यामध्ये ते अग्रेसर होते. त्यामुळे या भागातील नागरिकांनी रस्त्याचे कै.सुभाष हरीभाऊ सव्वाशे तथा तात्या सव्वाशे मार्ग असे कायमस्वरुपी नामकरण करणेस मागणी केली आहे. नागरिकांच्या मागणीनुसार सदर प्रस्तावावर धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

२. **सौ.नसिमा गैबीसो नाईक यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.१८ मधील शामरावनगर परिसरातील महसूल कॉलनी पिछाडीस मोठ्या प्रमाणावर रहिवास भाग विकसीत झालेला असून, सदर परिसरात अद्याप कोणतीही विशिष्ठ ओळख अथवा नाव नसल्यामुळे नागरिकांना त्यांचे दैनंदिन व्यवहार करणेस अडचणी येत आहेत. त्यामुळे सदर परिसराचे नामकरण करणेबाबत परिसरातील नागरिकांची मागणी होत असून, परिसरातील सर्व धर्मीय नागरीक रहात असल्यामुळे सदर परिसरात महाराष्ट्र कॉलनी असे नामकरण करणेस निर्णयार्थ आलेला प्रस्ताव.

३. **श्री.गजानन रामू मगदूम यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महानगरपालिका क्षेत्रामधील कुपवाड वॉर्ड क्र.२ मधील पंढरपूर रोड,मिरज येथील रहिवासी भाग हा नवनाथ नगर या नावाने पुर्वीपासून ओळखला जातो. कारण त्या ठिकाणी असणाऱ्या नागरिकांचे खरेदीपत्र देखील नवनाथ कुक्कुट पालन संस्थेकडून घेतले असल्यामुळे सदर ठिकाणी बस स्टॉपला देखील नवनाथ नगर बस स्टॉप असे नाव आहे व तिकीट देखील त्याच नावाने निघते. वरील वस्तुस्थिती पहाता तेथील रहिवाश्यांनी लेखी निवेदनाद्वारे सदर परिसरास व मुख्य चौकास नवनाथ नगर असे कायमस्वरुपी नामकरण करणेस धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

४. **श्री.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महानगरपालिका क्षेत्रामध्ये आण्णाभाऊ साठे यांचा सन २०२१ हा शतकोत्सव साजरा केला जाणार आहे. या उत्सवा निमित्त भागातील नागरिकांकडून महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.१० मधील सांगली कॉलेज व्हाया टिंबर एरिया ते माता रमाई उद्यान रस्त्यास (पुर्व-पश्चिम) साहित्य सम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे असे नामकरण करणेस वारंवार मागणी होत असल्याने सदर ठिकाणी नामकरण करणेस मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव.

५. **श्री.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महानगरपालिका क्षेत्रामध्ये मेहता हॉस्पिटल जवळील रिक्षा स्टॉप चौकास तत्कालीन सांगली नगरपालिकेचे बांधकाम सभापती तसेच शिक्षण मंडळाचे चेअरमन कै.मारुती तायाप्पा गाडे यांचे नाव कालकथित मारुती तायाप्पा गाडे असे नामकरण करणेस वारंवार मागणी होत असल्याने, सदर ठिकाणी कालकथित मारुती तायाप्पा गाडे असे नामकरण करणेस मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव.

६. **कु.सोनाली विलास सागरे यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रभाग क्र.८ मधील शामनगर हौसिंग सोसायटीचे विद्यमान चेअरमन रविंद्र जीवन नगरकर यांचे नुकतेच निधन झाले. सोसायटी बाबतचे त्यांचे योगदान लक्षात घेवून त्यांना आदरांजली म्हणून सोसायटीचे मुख्य प्रवेशद्वारावर कै.रविंद्र जीवन नगरकर यांचे नावाने स्वखर्चाने स्वागत कमान उभारणेचा सोसायटीमधील नागरिकांचा मानस असून, याकामी त्यांनी परवानगी मिळणेस मागणी केलेली आहे. तरी सदर ठिकाणी स्वखर्चाने स्वागत कमान उभारणेस परवानगी देणेकामी निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

७. **श्री.सुबराव नागाप्पा मद्रासी यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महानगरपालिका क्षेत्रातील घरपट्टी,पाणीपट्टी व इतर करांचा भरणा नागरिक सुविधा केंद्रामध्ये होत होता. परंतु काही वर्षापासून सदरचे नागरिक सुविधा केंद्र बंद करणेत आलेली आहेत. तसेच घरपट्टी विभाग व पाणी पुरवठा विभाग नविन इमारतीमध्ये स्थलांतरीत झाल्यामुळे गावभाग,सांगलीवाडी,खणभाग,शामरावनगर इ.परिसरातील नागरिकांना त्यांचे बिले भरणेस अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे पुर्वी प्रमाणे नागरीक सुविधा केंद्रे उभारुन सदरची बिले भरणा करुन घेतली जावीत अशी नागरिकांची मागणी होत आहे. त्यामुळे नागरिकांच्या मागणीनुसार या परिसरातील काही मध्यवर्ती ठिकाणे निश्चित करुन नागरिक सुविधा केंद्रे उभारणे गरजेचे आहे. सदर प्रस्तावावर चर्चा करुन निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

८. **सौ.उर्मिला उदय बेलवलकर यांनी दिलेला प्रस्ताव :-**

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सांगली प्रभाग क्र.१४ गवळी गल्ली मधील गजेंद्र बोळ चौक येथील सार्वजनिक मुतारी तातडीने पाडणेबाबत नागरिकांची वारंवार मागणी होत आहे. सदरची मुतारी ही लोकवस्तीत असल्यामुळे आजूबाजूच्या रहिवाश्यांना सदर मुतारीचा मोठ्या प्रामाणावर त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे सदर नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झालेला असल्यामुळे सदरची मुतारी तातडीने पाहणे गरजेचे असल्याने, सदर प्रस्तावावर निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

... २ ...

९. **श्री.योगेंद्र भगवान थोरात यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महानगरपालिका क्षेत्रातील पिठाच्या गिरणीचा व्यवसाय करणाऱ्या गिरणी व्यवसायीकांच्या वार्षिक लायसेन्स फी मध्ये पुर्वी असलेली वार्षिक फी रु. ३००/- मध्ये वार्षिक फी रु.३०००/- इतकी वाढ करणेत आलेली आहे. सदरचा व्यवसाय घरगुती चक्की व्यवसायामुळे मोडकळीस आलेला आहे. तसेच, मागील दोन वर्षात २०१९ मध्ये आलेला महापूर, सन २०२० मध्ये कोरोना मुळे सदरचा व्यवसाय संकटात आलेला असल्यामुळे वाढ करणेत आलेली रु.३०००/- फी कमी करुन ती रु.१५००/- इतकी करणेसाठी अध्यक्ष,मिरज शहर पिठ गिरणी मालक संघ,मिरज यांनी मागणी केलेनुसार गिरणी व्यवसायीकांच्या वार्षिक लायसेन्स फी मध्ये पुर्वी असलेली वार्षिक फी रु. ३००/- मध्ये वार्षिक फी रु.३०००/- इतकी केलेली वाढ कमी करुन ती वार्षिक फी रु.१५००/- इतकी करणेस मान्यता देणेसाठी सदर प्रस्तावावर चर्चा करुन निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

१०. **श्री.आनंदा मारुती देवमाने यांनी दिलेला प्रस्ताव :-**

मिरज शहरातील बालगंधर्व नाट्यगृहा शेजारी गेली कित्येक वर्षापासून रिक्षा स्टॉप नागरिकांच्या सेवेमध्ये कार्यरत आहे. परंतु, सदर रिक्षा स्टॉपला कोणतेही नाव अथवा ओळख नाही. त्यामुळे सदर रिक्षा स्टॉपला जनसेवा मित्र मंडळ रिक्षा स्टॉप असे नामकरण करणेबाबत रिक्षा चालक व परिसरातील नागरिकांची मागणी होत आहे. सदर प्रस्तावावर चर्चा करुन निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

११. **श्री.आनंदा मारुती देवमाने यांनी दिलेला प्रस्ताव :-**

कै.वसंतराव गुलझारीलाल अग्रवाल वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (WIFA) मुंबई या राज्यस्तरीय फुटबॉल संघटनेत उपाध्यक्ष,सहसचिव,एक्झिक्युटिव्ह कमिटी मेंबर अशा उच्चस्तरीय पदांवर काम करुन महाराष्ट्र राज्याच्या फुटबॉल वाढीसाठी बहुमोल काम केले आहे. सांगली जिल्हा फुटबॉल असोसिएशन या संघटनेची स्थापना १९७५ साली करुन जवळजवळ ४५ वर्ष त्यांनी सांगली जिल्ह्यातील फुटबॉल वाढीसाठी योगदान दिले, सांगली जिल्ह्यातील फुटबॉल खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धामुळे खेळण्याची संधी देवून शेकडो फुटबॉल खेळाडूंचे करियर त्यांनी घडवून आणले कित्येक खेळाडू शासकीय व निमशासकीय सेवेत समाविष्ट करण्यासाठी त्यांनी बहूमोल योगदान दिले.त्यांच्या कारकिर्दीत सांगली जिल्ह्याने फुटबॉल मध्ये पूर्ण भारतात नाव केले आहे. सांगली जिल्ह्यात भारतातील व महाराष्ट्रातील मोठमोठ्या राष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन करुन त्यांनी मिरजेचे व सांगली जिल्ह्याचे नाव लौकिक होण्यास मदत केली. मिरज मध्ये गेली ४५ वर्ष सांगली जिल्हा साखळी फुटबॉल स्पर्धांचे आयोजन करुन पूर्ण सांगली जिल्ह्यात असंख्य फुटबॉल चे संघ त्यांनी तयार केले. मिरज नगरपरिषदेचे मिरज चे माजी नगरसेवक व पाणी पुरवठा व जलनि:सारण समितीचे सभापती होते. अखिल भारतीय मराठी प्रत्रकार संघटनेचे चिटणीस,साप्ताहिक हरिजन सेवक ग्रा वृत्तप्रत्राचे संप्रादक, अखिल भारतीय रास्त भाव धान्य दुकानदार संघटनेचे राष्ट्रीय सचिव व ऑल महाराष्ट्र रास्त भाव दुकानदार संघटनेचे वरिष्ठ कार्याध्यक्ष अशा विविध पदावर त्यांनी काम पाहिले. त्यांच्या कार्याची आठवण रहावी व त्यांना आदरांजली म्हणून मिरज येथील शिवाजी क्रिडांगणातील पॅव्हेलियन बिल्डींगला कै.वसंतराव गुलझारीलाल अग्रवाल असे नामकरण करणेबाबत क्रिडा प्रेमी व नागरिकांची मागणी असून, सदर प्रस्तावावर चर्चा करुन निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

१२. **श्री.प्रकाश बाबासो ढंग यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड वॉर्ड क्र.२ मधील कुपवाड तलाठी ऑफीस ते मिरज रोड थोरला गणपती चौका पर्यत असणारे रस्त्यास श्री.बसवेश्वर महाराज मार्ग असे नामकरण करणसे सदर परिसरातील नागरिक मागणी करीत आहेत. महापुरुषांच्या कार्याची आठवण म्हणून रस्त्यास नागरिकांच्या मागणीनुसार श्री.बसवेश्वर महाराज मार्ग असे नाव देणेसाठी सदर प्रस्तावावर चर्चा करुन निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

१३. **श्री.शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड वॉर्ड क्र.१ मधील कुपवाड कवलापूर रस्त्यालगत असलेल्या अवधुत कॉलनी मधील कवलापूर मुख्य रस्त्यापासून ते पाण्याच्या टाकीपर्यत दोन्ही बाजूच्या रस्त्यांना श्री.बसवेश्वर महाराज मार्ग असे नामकरण करणेस सदर परिसरातील नागरिक मागणी करीत आहेत. महापुरुषांच्या कार्याची आठवण म्हणून सदर रस्त्यास नागरिकांच्या मागणीनुसार श्री.बसवेश्वर महाराज मार्ग असे नाव देणेसाठी सदर प्रस्तावावर चर्चा करुन निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

१४. **सौ.अनारकली जमीर कुरणे यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महानगरपालिकेच्या बालवाडीमध्ये सर्वसामान्य कुटूंबातील ज्यांना खाजगी शाळांच्या भरमसाठ फी भरता येत नाही अशा कुटूंबातील मुलां-मुलींच्या सर्वांगीण बुद्धीमत्ता कौशल्यांचा विकास होणेसाठी प्रवेश घेत असतात. मनपा शाळांमधून जर बालवाडी बंद केल्या तर पुढे पहिलीसाठी पट मिळणार नाही व मनपाच्या शाळा बंद पडतील म्हणून बालवाडी बंद न करता तशाच चालू ठेवणेकामी सदर प्रस्तावावर चर्चा करुन निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

---

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक : ०५ / ०२ / २०२१.

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :- १०/०२/२०२१

ठराव क्रमांक :- १०५

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त,मिरज (आरोग्य विभाग,मिरज) यांचे दि.०२/०२/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका व जिवनज्योत कॅन्सर रिलीफ ॲण्ड केअर ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने कॅन्सर रुग्णांवर उपचार करण्याकामी जिवनआधार सांगली, प्रोजेक्ट सुरु करण्यासाठी वॉर्ड क्रमांक ९ मधील सर्व्हे क्रमांक ३०२ पैकी सि.स.नं.७८१०, ७८११ ही जागा २९ वर्षे कालावधीसाठी देणेकामी धोरणात्मक निर्णयासाठी आलेले प्रस्तावावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

जिवनज्योत कॅन्सर रिलीफ ॲण्ड केअर ट्रस्ट कर्करोगाने ग्रस्त आणि गरीब रुग्णांच्या कल्याणासाठी काम करीत असून, सदर ट्रस्टद्वारे गरजू व गरीब रुंग्णांसाठी निदान होईपर्यत तपासण्या करणे, वैद्यकिय मार्गदर्शन,आर्थिक मार्गदर्शन आणि उपचार देवून पोस्ट उपचार, वैद्यकिय मदत विनामुल्य अन्न व औषधे आणि आजारी बेडसेवा दिली जाते. कर्करोगाच्या रुग्णांना आयुष्यात आशा आणि आनंदाचे किरण आणण्यासाठी ही ट्रस्ट कार्य करीत आहे.

या ट्रस्टच्या एकंदरीत कामाचा विचार करता तसेच त्यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका व जिवनज्योत कॅन्सर रिलीफ ॲण्ड केअर ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने कॅन्सर रुग्णांवर उपचार करणेसाठी जिवन आधार सांगली प्रोजेक्ट सुरु करणेस ही सभा सहमती दर्शवित असून, सदर प्रोजेक्टसाठी महापालिकेच्या वॉर्ड क्र.९ मधील स.नं.३०२ पैकी सि.स.नं.७८१० स.नं.७८११ या जागेमध्ये ५ ते १० गुंठे जागा २९ वर्षे मुदतीने देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सदर प्रोजेक्ट महापालिका व जिवनज्योत कॅन्सर रिलीफ ॲण्ड केअर ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने एक पायलट प्रोजेक्ट होणार असलेने, सदर प्रोजेक्टसाठी महापालिका सदस्य व संबंधीत ट्रस्ट यांची खालील प्रमाणे संनियंत्रण कमिटी गठीत करणेत येत आहे.

| | |
|---|---|
| १. महापौर | :- अध्यक्ष |
| २. आयुक्त,मनपा. | :- सदस्य |
| ३. स्थायी समिती सभापती | :- सदस्य |
| ४. सभागृहनेता | :- सदस्य |
| ५. विरोधी पक्षनेता | :- सदस्य |
| ६. उपायुक्त (मुख्यालय) | :- सदस्य |
| ७. स्थानिक नगरसेवक | :- सदस्य |
| ८. ट्रस्ट प्रतिनिधी | :- सदस्य |
| ९. वैद्यकिय आरोग्याधिकारी | :- सदस्य सचिव |

सदर प्रोजेक्टसाठी महापालिका व संबंधीत ट्रस्ट यांचेमध्ये रितसर शर्ती-अटींचा करार करुन, तो महासभेच्या निदर्शनास आणावा. तसेच सदर संस्था जे कॅन्सर रुग्णांना सेवा व औषधोपचार देणार आहे त्यापैकी कोणत्या सेवा मोफत पुरविल्या जाणार आहेत. तसेच ज्या सेवा, तपासण्या उपचारासाठी फी आकारली जाणार आहे. ती माफक व ना-नफा ना-तोटा या तत्वावर रुग्णांना पुरविली जाईल यासाठी सनियंत्रण समितीने दराची निश्चिती करावी तसेच, सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सदर रुग्णालयाच्या सर्व सेवा मोफत देणेची अट करारपत्रात नमुद करावी असे ही सभा सूचित करीत आहे.

तसेच, उपरोक्त जागेबाबत कोणतीही अडचण निर्माण झाल्यास सदर कामी पर्यायी जागा निश्चित करणेचे अधिकार ही सभा मा.आयुक्तसो यांना प्रदान करीत आहे.

सूचक :- श्री.पांडुरंग कोरे. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.विनायक सिंहासने.

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापौर,

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :- १०/०२/२०२१

ठराव क्रमांक :- १०६

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (कर निर्धारण व संकलन विभाग) यांचे दि.०८/०२/२०२१ रोजीचे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये सन २०१९-२०२० मध्ये आलेल्या महापुरामुळे जनजीवन विस्कळीत होवून, नागरीक,व्यापारी व संघटनांचे बऱ्याच प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असल्याने, त्यांनी घरपट्टी माफ अथवा सवलत मिळणेसाठी निवेदनही दिलेले आहे. महापालिका क्षेत्रामधील नागरीकांचे महापुरामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्यामुळे कर वसुली न झाल्याने, थकबाकीची रक्कम वाढत आहे.

तसेच, सन २०२०-२१ मध्ये कोव्हीड -१९ या संसर्गाच्या प्रार्दुभावामुळे मा.शासनाकडून लॉकडॉऊनवर भर दिल्याने, आर्थिक व्यवहार ठप्प होवून, त्याचाही मोठ्या प्रमाणात जनजीवनावर परिणाम होवून, नागरीकांचे आर्थिक नुकसान झालेले आहे. कोव्हीड कालावधीत ऑनलाईन बिले वितरीत केल्याने कर वसुली न झालेने थकबाकीची रक्कम वाढलेली आहे.

उपरोक्त सन २०१९-२० मधील आलेला महापूर व सन २०२०-२१ मधील कोव्हिड -१९ चा संसर्ग विचारात घेवून, नागरिकांना मालमत्ता कराच्या शास्तीमध्ये १००% सवलत दिल्यास महापालिकेच्या मालमत्ता कराची थकबाकी मोठ्या प्रमाणात वसुल होईल तसेच, नागरिकांनाही शास्ती मध्ये सवलत मिळाल्यामुळे दिलासा मिळणार आहे असे या सभेचे मत आहे.

तसेच, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ८ कराधान नियम मधील क्र.५१ मधील तरतुदी अन्वये नियम ४१ मधील शास्ती व नियम ५० मधील फी वसुली पुर्णत: माफ करणे अथवा अशंत: माफ करणेचा अधिकार मा.आयुक्तसो यांना आहेत त्यानुसार सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये माहे मार्च २०२१ पर्यत थकीत मालमत्ता कराची रक्कम एक रक्कमी भरणाऱ्या नागरिकांना दि.१५ फेब्रुवारी २०२१ ते दि.३१ मार्च २०२१ अखेरच्या कालावधीसाठी शास्तीमध्ये १००% सवलत देणेस व सदर योजनेस मालमत्ता कर अभय योजना संबोधणेस ही सभा मान्यता देत असून, त्याप्रमाणे सदर योजनेची माहिती थकबाकीदार यांचेपर्यत पोहोचविण्यासाठी जाहिर प्रसिद्धी देवून, योग्यती कार्यवाही प्रशासनाने ठेवावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री. पांडुरंग कोरे. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. विनायक सिंहासने. महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :- १०/०२/२०२१

ठराव क्रमांक :- १०५

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्य श्री.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत सन्मा.सदस्यांनी मागणी केलेल्या महानगरपालिका क्षेत्रातील खालील विकास कामांच्या प्रस्तावास मा.जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा नियोजन समितीकडे प्रशासकीय मान्यतेस्तव व निधी मागणीसाठी प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय र.रु. |
|---|---|---|
| १. | प्रभाग क्र.८ मधील यशवंतराव होळकर चौक (विजयनगर) ते कुपवाडकडे जाणाऱ्या रस्त्याचे रुंदीकरण व आर.सी.सी.नाला बांधणे. | ३,१८,३४,०००/- |
| २. | वॉर्ड क्र.१७ मधील कोरे आयकॉन ते केळकर पेट्रोल पंप येथील साईडपट्टी रस्ता करणे. | ३३,२५,३००/- |
| ३. | वॉर्ड क्र.१७ मधील चांदणी चौक परिसरातील गटारी करणे. | २४,६५,८००/- |
| ४. | वॉर्ड क्र.१७ मधील मनपा भूखंड क्र.१२४३८ मधील सभागृहा समोरील कॉंक्रिटकरण करणे. | १२,१५,०००/- |
| ५. | वॉर्ड क्र.९ कुपवाड शिंदेमळा येथील पाटीदार किराणा स्टोअर्स ते निंबाळकर घरापर्यंतचे रस्ते हॉटमिक्स डांबरी करणे | १९,७५,२००/- |
| ६. | वॉर्ड क्र.९ कुपवाड शिंदेमळा येथील अजिंक्य पतसंस्था ते जलाराम अपार्टमेंट आणि चौगुले घर ते दोरकर घरापर्यंतचे रस्ते हॉटमिक्स डांबरी करणे | १८,१५,८००/- |
| ७. | वॉर्ड क्र.९ कुपवाड शिंदेमळा येथील स्वामी समर्थ किराणा स्टोअर्स ते जलराम अपार्टमेंट आणि श्रीजी अपार्टमेंट ते गुरुकृपा घरापर्यंतचे रस्ते हॉटमिक्स डांबरी करणे | १३,६३,०००/- |
| ८. | वॉर्ड क्र.९ कुपवाड स्टेट बँक कॉलनी येथील बाळू बंडगर घर ते साई प्रसाद अपार्टमेंट पर्यतचे रस्ते हॉटमिक्स डांबरी करणे | १२,४०,०००/- |
| ९. | वॉर्ड क्र.९ कुपवाड शिंदेमळा येथील राज चिकन सेंटर ते बारडोल टेलर आणि सुनिल तिवले घर ते ओंकार घरापर्यंतचे रस्ते हॉटमिक्स डांबरी करणे | १३,२२,६००/- |

सूचक :- श्री: विष्णू माने.

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री: संतोष पाटील.

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापौर,

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- १०/०२/२०२१

**महासभा क्रमांक :- ०५**

ठराव क्रमांक :- १०८

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.१०/०२/२०२१ रोजीचे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडे कार्यरत असलेल्या बदली सफाई कर्मचारी यांना कायम कर्मचारी यांचे गैरहजेरी, रजा कालावधी तसेच शासकीय सुट्टी व साप्ताहिक सुट्टी दिवशी बदली कर्मचारी यांना रोटेशननुसार काम देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. पांडुरंग कोरे.

अनुमोदक :- श्री. विनायक सिंहासने

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रत - आरोग्य (आवक)

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :- १०/०२/२०२१

ठराव क्रमांक :- १०१

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.पांडूरंग मार्तंड कोरे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील मिरज वॉर्ड क्र.४ मधील ब्राम्हणपूरी येथील काशिविश्वेश्वर मंदिर ते सव्वाशे घर या रस्त्यास कै.सुभाष हरीभाऊ सव्वाशे तथा तात्या सव्वाशे मार्ग असे कायमस्वरुपी नामकरण करणेबाबत परिसरातील नागरिकांची मागणी होत आहे. कै.लक्ष्मण सव्वाशे हे मिरज शहरातील नामवंत मंडप व्यावसायीक होते. आपल्या व्यवसायाच्या माध्यमातून गोर गरीबांना मदतीचा हात दिला असून, सामाजिक कार्यामध्ये ते अग्रेसर होते. त्यामुळे या भागातील नागरिकांनी रस्त्याचे कै.सुभाष हरीभाऊ सव्वाशे तथा तात्या सव्वाशे मार्ग असे कायमस्वरुपी नामकरण करणेस मागणी केली आहे. नागरिकांच्या मागणीनुसार सदर ठिकाणी नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.पांडूरंग कोरे ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.विनायक सिंहासने महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :- १०/०२/२०२१

ठराव क्रमांक :- ११०

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.नसिमा गैबीसो नाईक यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.१८ मधील शामरावनगर परिसरातील महसूल कॉलनी पिछाडीस मोठ्या प्रमाणावर रहिवास भाग विकसीत झालेला असून, सदर परिसरात अद्याप कोणतीही विशिष्ठ ओळख अथवा नाव नसल्यामुळे नागरिकांना त्यांचे दैनंदिन व्यवहार करणेस अडचणी येत आहेत. त्यामुळे सदर परिसराचे नामकरण करणेबाबत परिसरातील नागरिकांची मागणी होत असून, परिसरातील र्सव धर्मीय नागरीक रहात असल्यामुळे सदर परिसरात महाराष्ट्र कॉलनी असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- सौ. अप्सरा वायदंडे

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. शिवाजी दुर्वे

महापौर,

महानगरपालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :- १०/०२/२०२१

ठराव क्रमांक :- १११

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.गजानन रामू मगदूम यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रामधील कुपवाड वॉर्ड क्र.२ मधील पंढरपूर रोड,मिरज येथील रहिवासी भाग हा नवनाथ नगर या नावाने पुर्वीपासून ओळखला जातो. कारण त्या ठिकाणी असणाऱ्या नागरिकांचे खरेदीपत्र देखील नवनाथ कुक्कुट पालन संस्थेकडून घेतले असल्यामुळे सदर ठिकाणी बस स्टॉपला देखील नवनाथ नगर बस स्टॉप असे नाव आहे व तिकीट देखील त्याच नावाने निघते. वरील वस्तुस्थिती पहाता तेथील रहिवाश्यांनी लेखी निवेदनाद्वारे सदर परिसरास व मुख्य चौकास नवनाथ नगर असे कायमस्वरुपी नामकरण करणेकामी सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार ही सभा सदरचा प्रस्ताव प्रलंबित ठेवीत आहे.

सूचक :- श्री. शिवाजी दुर्वे

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- स्नौ. अप्सरा वायदंडे

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिक

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- १०/०२/२०२१

**महासभा क्रमांक :- ०५**

ठराव क्रमांक :- ११२

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये आण्णाभाऊ साठे यांचा सन २०२१ हा शतकोत्सव साजरा केला जाणार आहे. या उत्सवा निमित्त भागातील नागरिकांकडून महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.१० मधील सांगली कॉलेज व्हाया टिंबर एरिया ते माता रमाई उद्यान रस्त्यास (पुर्व-पश्चिम) साहित्य सम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे असे नामकरण करणेस वारंवार मागणी होत असल्याने सदर ठिकाणी नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.पांडुरंग कोरे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.विनायक सिंहासने.

महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :- १०/०२/२०२१

ठराव क्रमांक :- ११३

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये मेहता हॉस्पिटल जवळील रिक्षा स्टॉप चौकास तत्कालीन सांगली नगरपालिकेचे बांधकाम सभापती तसेच शिक्षण मंडळाचे चेअरमन कै.मारुती तायाप्पा गाडे यांचे नाव कालकथित मारुती तायाप्पा गाडे असे नामकरण करणेस वारंवार मागणी होत असल्याने, सदर ठिकाणी कालकथित मारुती तायाप्पा गाडे असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.पांडुरंग कोरे

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.विनायक सिंहासने

महापौर,

मा.नगरसचिव यांचेकडे

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :- १०/०२/२०२१

ठराव क्रमांक :- ११४

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या कु.सोनाली विलास सागरे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रभाग क्र.८ मधील शामनगर हौसिंग सोसायटीचे विद्यमान चेअरमन रविंद्र जीवन नगरकर यांचे नुकतेच निधन झाले. सोसायटी बाबतचे त्यांचे योगदान लक्षात घेवून त्यांना आदरांजली म्हणून सोसायटीचे मुख्य प्रवेशद्वारावर कै.रविंद्र जीवन नगरकर यांचे नावाने स्वखर्चाने स्वागत कमान उभारणेचा सोसायठीमधील नागरिकांचा मानस असून, याकामी त्यांनी परवानगी मिळणेस मागणी केलेली आहे. तरी सदर ठिकाणी स्वखर्चाने स्वागत कमान उभारणेस परवानगी देणेकामी निर्णय घेणेकामी आलेला प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार सहा.संचालक नगररचना आणि शहर अभियंता यांनी समन्वय साधून पहाणी करुन, सदर ठिकाणी वाहतुकीस अडथळा होणार नाही याची दक्षता घेणेच्या अटीवर सदर प्रस्तावावर मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.पांडुरंग कोरे. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.विनायक सिंहासने.

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :- १०/०२/२०२१

ठराव क्रमांक :- ११५

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.सुबराव नागाप्पा मद्रासी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील घरपट्टी,पाणीपट्टी व इतर करांचा भरणा नागरिक सुविधा केंद्रामध्ये होत होता. परंतु काही वर्षापासून सदरचे नागरिक सुविधा केंद्र बंद करणेत आलेली आहेत. तसेच घरपट्टी विभाग व पाणी पुरवठा विभाग नविन इमारतीमध्ये स्थलांतरीत झाल्यामुळे गावभाग,सांगलीवाडी, खणभाग,शामरावनगर इ.परिसरातील नागरिकांना त्यांचे बिले भरणेस अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे पुर्वी प्रमाणे नागरीक सुविधा केंद्रे उभारुन सदरची बिले भरणा करुन घेतली जावीत अशी नागरिकांची मागणी होत आहे. त्यामुळे नागरिकांच्या मागणीनुसार या परिसरातील काही मध्यवर्ती ठिकाणे निश्चित करुन नागरिक सुविधा केंद्रे उभारणे गरजेचे असल्याने, सदर ठिकाणी नागरिक सुविधा केंद्रे उभारणी करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री पांडुरंग कोरे ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. विनायक सिंहासने

महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :- १०/०२/२०२१

ठराव क्रमांक :- ११६

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य सौ.उर्मिला उदय बेलवलकर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सांगली प्रभाग क्र.१४ गवळी गल्ली मधील गजेंद्र बोळ चौक येथील सार्वजनिक मुतारी तातडीने पाडणेबाबत नागरिकांची वारंवार मागणी होत आहे. सदरची मुतारी ही लोकवस्तीत असल्यामुळे आजूबाजूच्या रहिवाश्यांना सदर मुतारीचा मोठ्या प्रामाणावर त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे सदर नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झालेला असल्यामुळे सदरची मुतारी तातडीने पाहणे गरजेचे असल्याने, सदर ठिकाणी असलेली सार्वजनिक मुतारी पाडणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.मगेंश मारुती चव्हाण यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिकेच्या वॉर्ड क्र.१५ मधील क्रांति क्लिनीक समोरील मुतारी पाडणेस नागरिकांचेकडून मागणी होत आहे. त्यानुसार सदरची मुतारी पाडणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.पांडूरंग कोरे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.विनायक सिंहासने.

महापौर,

सही/- (प्र.न.स.९)

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :- १०/०२/२०२१

ठराव क्रमांक :- ११७

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.योगेंद्र भगवान थोरात यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील पिठाच्या गिरणीचा व्यवसाय करणाऱ्या गिरणी व्यवसायीकांच्या वार्षिक लायसेन्स फी मध्ये पुर्वी असलेली वार्षिक फी रु. ३००/- मध्ये वार्षिक फी रु.३०००/- इतकी वाढ करणेत आलेली आहे. सदरचा व्यवसाय घरगुती चक्की व्यवसायामुळे मोडकळीस आलेला आहे. तसेच, मागील दोन वर्षात २०१९ मध्ये आलेला महापूर, सन २०२० मध्ये कोरोना मुळे सदरचा व्यवसाय संकटात आलेला असल्यामुळे वाढ करणेत आलेली रु.३०००/- फी कमी करुन ती रु.१५००/- इतकी करणेसाठी अध्यक्ष,मिरज शहर पिठ गिरणी मालक संघ,मिरज यांनी मागणी केलेनुसार गिरणी व्यवसायीकांच्या वार्षिक लायसेन्स फी मध्ये पुर्वी असलेली वार्षिक फी रु. ३००/- मध्ये वार्षिक फी रु.३०००/- इतकी केलेली वाढ कमी करुन ती वार्षिक फी रु.१५००/- इतकी करणेस मान्यता देणेसाठी सदर प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार सदर प्रस्तावावर प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री.पांडूरंग कोरे. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.विनायक सिंहासने. महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :- १०/०२/२०२१

ठराव क्रमांक :- ११८

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.आनंदा मारुती देवमाने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मिरज शहरातील बालगंधर्व नाट्यगृहा शेजारी गेली कित्येक वर्षापासून रिक्षा स्टॉप नागरिकांच्या सेवेमध्ये कार्यरत आहे. परंतु, सदर रिक्षा स्टॉपला कोणतेही नाव अथवा ओळख नाही. त्यामुळे सदर रिक्षा स्टॉपला जनसेवा मित्र मंडळ रिक्षा स्टॉप असे नामकरण करणेबाबत रिक्षा चालक व परिसरातील नागरिकांची मागणी होत आहे. सदर ठिकाणी नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- सौ. अप्सरा वायदंडे

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. शिवाजी दुर्वे

महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :- १०/०२/२०२१

ठराव क्रमांक :- ११६

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.आनंदा मारुती देवमाने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

कै.वसंतराव गुलझारीलाल अग्रवाल वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (WIFA) मुंबई या राज्यस्तरीय फुटबॉल संघटनेत उपाध्यक्ष,सहसचिव,एक्झिक्युटिव्ह कमिटी मेंबर अशा उच्चस्तरीय पदांवर काम करुन महाराष्ट्र राज्याच्या फुटबॉल वाढीसाठी बहुमोल काम केले आहे. सांगली जिल्हा फुटबॉल असोसिएशन या संघटनेची स्थापना १९७५ साली करुन जवळजवळ ४५ वर्ष त्यांनी सांगली जिल्ह्यातील फुटबॉल वाढीसाठी योगदान दिले, सांगली जिल्ह्यातील फुटबॉल खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धामुळे खेळण्याची संधी देवून शेकडो फुटबॉल खेळाडूंचे करियर त्यांनी घडवून आणले कित्येक खेळाडू शासकीय व निमशासकीय सेवेत समाविष्ट करण्यासाठी त्यांनी बहूमोल योगदान दिले.त्यांच्या कारकिर्दीत सांगली जिल्ह्याने फुटबॉल मध्ये पूर्ण भारतात नाव केले आहे. सांगली जिल्ह्यात भारतातील व महाराष्ट्रातील मोठमोठ्या राष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन करुन त्यांनी मिरजेचे व सांगली जिल्ह्याचे नाव लौकिक होण्यास मदत केली. मिरज मध्ये गेली ४५ वर्ष सांगली जिल्हा साखळी फुटबॉल स्पर्धांचे आयोजन करुन पूर्ण सांगली जिल्ह्यात असंख्य फुटबॉल चे संघ त्यांनी तयार केले. मिरज नगरपरिषदेचे मिरज चे माजी नगरसेवक व पाणी पुरवठा व जलनि:सारण समितीचे सभापती होते. अखिल भारतीय मराठी पत्रकार संघटनेचे चिटणीस,साप्ताहिक हरिजन सेवक या वृत्तपत्राचे संपादक, अखिल भारतीय रास्त भाव धान्य दुकानदार संघटनेचे राष्ट्रीय सचिव व ऑल महाराष्ट्र रास्त भाव दुकानदार संघटनेचे वरिष्ठ कार्याध्यक्ष अशा विविध पदावर त्यांनी काम पाहिले. त्यांच्या कार्याची आठवण रहावी व त्यांना आदरांजली म्हणून मिरज येथील शिवाजी क्रिडांगणातील पॅव्हॅलियन बिल्डींगला कै.वसंतराव गुलझारीलाल अग्रवाल असे नामकरण करणेबाबत क्रिडा प्रेमी व नागरिकांची मागणी असून, सदर प्रस्तावावर मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. पांडुरंग कोरे

ठराव सर्वानुमते मंजुर

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अनुमोदक :- श्री. विनायक सिंहासने

महापौर,

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :- १०/०२/२०२१

ठराव क्रमांक :- १२०

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.प्रकाश बाबासो ढंग यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड वॉर्ड क्र.२ मधील कुपवाड तलाठी ऑफीस ते मिरज रोड थोरला गणपती चौका पर्यत असणारे रस्त्यास श्री.बसवेश्वर महाराज मार्ग असे नामकरण करणसे सदर परिसरातील नागरिक मागणी करीत आहेत. महापुरुषांच्या कार्याची आठवण म्हणून रस्त्यास नागरिकांच्या मागणीनुसार श्री.बसवेश्वर महाराज मार्ग असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. पांडुरंग कोरे ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. विनायक सिंहासने

महापौर,

सत्यप्रत कार्यवाहीस

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :- १०/०२/२०२१

ठराव क्रमांक :- १२१

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड वॉर्ड क्र.१ मधील कुपवाड कवलापूर रस्त्यालगत असलेल्या अवधुत कॉलनी मधील कवलापूर मुख्य रस्त्यापासून ते पाण्याच्या टाकीपर्यत दोन्ही बाजूच्या रस्त्यांना श्री.बसवेश्वर महाराज मार्ग असे नामकरण करणेस सदर परिसरातील नागरिक मागणी करीत आहेत. महापुरुषांच्या कार्याची आठवण म्हणून सदर रस्त्यास नागरिकांच्या मागणीनुसार श्री.बसवेश्वर महाराज मार्ग असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. पांडुरंग कोरे. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. विनायक सिंहासने.

महापौर,

महानगरपालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :- १०/०२/२०२१

ठराव क्रमांक :- १२२

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.अनारकली जमीर कुरणे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या बालवाडीमध्ये सर्वसामान्य कुटूंबातील ज्यांना खाजगी शाळांच्या भरमसाठ फी भरता येत नाही अशा कुटूंबातील मुलां-मुलींच्या सर्वांगीण बुद्धीमत्ता कौशल्यांचा विकास होणेसाठी प्रवेश घेत असतात. मनपा शाळांमधून जर बालवाडी बंद केल्या तर पुढे पहिलीसाठी पट मिळणार नाही व मनपाच्या शाळा बंद पडतील म्हणून बालवाडी बंद न करता तशाच चालू ठेवणेकामी सदर प्रस्तावावर चर्चा करुन निर्णय घेणेकामी आलेला प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार महापालिकेच्या शाळेतील बालवाड्या बंद करु नयेत असे या सभेचे मत असून, त्याबाबत प्रशासनाने सविस्तर प्रस्ताव मा.शासनाकडे सादर करणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री. गणेश माळी. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. पांडूरंग कोरे.

महापौर.

प्रभारी नगरसचिव (प्रा.शो.म)

महानगरपालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका